ट्रामा केअर युनिट, काटोल, जि.नागपूर येथील ९ अस्थाई पदे पुढे चालू ठेवण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
सार्वजनिक आरोग्य विभाग
शासन निर्णय क्रमांकः पदआ २०१८/ प्र.क्र.१३६/ आरोग्य-३

१० वा मजला, संकुल इमारत,
गो.ते.रुग्णालय, मुंबई-४०० ००१.
तारीख: ०४ मे, २०१८.

<u>वाचा -</u>

१) शासन निर्णय सार्वजनिक आरोग्य विभाग, क्रमांक-पदआ-२०१७/प्र.क्र.७१/आरोग्य-३, दिनांक- १५.०१.२०१८

२) आरोग्य सेवा संचालनालय, मुंबई यांचे पत्र क्रमांक- संआसे/कक्ष-३/टे-५अ/ट्राकेयुकाटोल/अपदे-९/३८६९-७०/१८, दिनांक-२७.०४.२०१८.

शासन निर्णय-

उपरोक्त संदर्भाधीन अ.क्र. १ येथील शासन निर्णयान्वये उपसंचालक, आरोग्य सेवा, नागपूर मंडळ, नागपूर यांच्या अधिपत्याखालील ट्रामा केअर युनिट, काटोल, जि.नागपूर येथील ९ अस्थाई पदांना दि.०१.०१.२०१८ ते दि.२८.०२.२०१८ पर्यंत पुढे चालू ठेवण्यास मान्यता देण्यात आली होती.

२. आता या शासन निर्णयान्वये ट्रामा केअर युनिट, काटोल, जि.नागपूर येथील सदर ९ अस्थाई पदांना दि.०१.०३.२०१८ ते दि.३०.०९.२०१८ पर्यंत पुढे चालू ठेवण्यास मान्यता देण्यात येत आहे.

३. सदर पदांवरील खर्च खालील लेखाशिर्षातून खर्ची घालण्यात यावा आणि हा खर्च सन २०१८- २०१९ या वर्षाकरीता मंजूर अनुदानातून भागविण्यात यावा.

<u>मागणी क्रमांक-आर-१</u>

२२१० - वैद्यकीय सेवा व सार्वजनिक आरोग्य
०६ - सार्वजनिक आरोग्य
०१० - किमान गरजा कार्यक्रम - पंचवार्षिक योजनांतर्गत योजना
राज्य योजनांतर्गत योजना
(०१)(१०) - ट्रामा केअर युनिटची स्थापना, महाराष्ट्र आपत्कालीन सेवा प्रकल्प (२२१० ४६८९)

४. हा शासन निर्णय वित्त विभागाच्या क्र.पदनि-२०१६/प्र.क्र.८/१६/आपुक,दिनांक-०५.०३.२०१८ च्या शासन निर्णयान्वये प्रशासकीय विभागांना प्रदान केलेल्या अधिकारानुसार निर्गमीत करण्यात येत आहे.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१८०५०४१४१९५९८८१७ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Roshani Dinesh Kadam Patil

Digitally signed by Roshani Dinesh Kadam Patil
DN: CN = Roshani Dinesh Kadam Patil, C = IN, S = Maharashtra, O = Government Of Maharashtra, OU = Public Health Department
Date: 2018.05.04 15:36:23 +05'30'

(रो.दि.कदम-पाटील)
अवर सचिव,महाराष्ट्र शासन

प्रत,

१. महालेखापाल,महाराष्ट्र-१/२ (लेखा परिक्षा) (लेखा व अनुज्ञेयता), मुंबई/नागपूर.
२. संचालक, आरोग्यसेवा, मुंबई.
३. सहसंचालक, आरोग्य सेवा(रुग्णालये- राज्यस्तर), मुंबई.
४. सहसंचालक, आरोग्य सेवा(अर्थ व प्रशासन), मुंबई.
५. उपसंचालक, आरोग्य सेवा, नागपूर मंडळ, नागपूर.
६. जिल्हा शल्य चिकित्सक, नागपूर.
७. जिल्हा कोषागार अधिकारी, नागपूर.
८. वैद्यकीय अधिक्षक, ट्रामा केअर युनिट, काटोल, जि.नागपूर.
९. वित्त विभाग,(व्यय-१३) मंत्रालय,मुंबई.
१०.कार्यासन अधिकारी, सेवा-२/सेवा-३/सेवा-५/अर्थसंकल्प,सा.आ.वि.मंत्रालय,मुंबई.
११.निवडनस्ती (आरोग्य-३)

शासन निर्णय, सार्वजनिक आरोग्य विभाग, क्रमांक-पदआ २०१८ /प्र.क्र.१३६/आरोग्य-३,
विवरणपत्र.

अ.क्र.	पदनाम	वेतनश्रेणी व ग्रेड पे (रुपये)	अस्थाई पद संख्या
१	अस्थिव्यंग शल्यचिकित्सक, वर्ग-२	१५६००-३९१०० (ग्रेड पे ५४००)	१
२	बधिरीकरण शास्त्रज्ञ, वर्ग-२	१५६००-३९१०० (ग्रेड पे ५४००)	२
३	वैद्यकीय अधिकारी, वर्ग-२	१५६००-३९१०० (ग्रेड पे ५४००)	२
४	परिसेविका, वर्ग-३	९३००-३४८०० (ग्रेड पे ४३००)	१
५	अधिपरिचारीका, वर्ग-३	९३००-३४८०० (ग्रेड पे ४२००)	३
एकूण			**९**